# उप वनसंरक्षक, शहापूर वनविभाग, शहापूर यांचे कार्यालय

महाराष्ट्र वन विभाग

शहापूर-आसनगांव रोड, जूना आग्रारोड, आसनगांव, मु.पो.ता. शहापूर, जि. ठाणे 421 601
दुरध्वनी क्रमांक: 02527/272096 फॅक्स क्रमांक: 02527/272096
ईमेल: dcfshahapur@gmail.com, dycfshahapur@mahaforest.gov.in


<u>तातडीचे</u>

विषय:- नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग (पॅकेज-5) करीता वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत ठाणे व नाशिक जिल्हयातील एकूण 383.8535 हेक्टर वनजमीन वळतीकरण करणेबाबतचा प्रस्ताव...
<u>FP/MH/ROAD/34047/2018</u>

जा.क्र. कक्ष-6(3)/20/जमीन/ 1426 /2018-19
शहापूर 421 601 दिनांक 30/ 06 / 2018

प्रति,

कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,
बांद्रा रिक्लेमेशन बस स्टॉपचे समोर,
लिलावती हॉस्पिटलजवळ,
के. सी. मार्ग, बांद्रा (पश्चिम), मुंबई - 400 050

संदर्भ:- 1) आपलेकडील पत्र क्र. MSRDC/NMSCEW/Forest/4665/2018, दिनांक 14/06/2018 (या कार्यालयास प्राप्त दिनांक 21/06/2018)
2) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-6(3)/20/जमीन/1380/18-19, दिनांक 28/06/2018
3) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयाकडून दिनांक 27/06/2018 रोजी ऑनलाईन प्राप्त प्रस्ताव

विषयांकित प्रकरणी आपण उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग (पॅकेज-5) करीता वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत ठाणे व नाशिक जिल्हयातील एकूण 383.8535 हेक्टर वनजमीन वळतीकरण करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे. तसेच <u>www.forestsclearance.nic.in</u> या संकेतस्थळावर आपण Online सादर केलेला प्रस्ताव <u>FP/MH/ROAD/34047/2018</u> अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयाकडून दिनांक 27/06/2018 रोजी ऑनलाईन प्राप्त झाला आहे.

वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग (पॅकेज-5) करीता ठाणे वनवृत्तातील शहापूर व ठाणे वनविभागातील व नाशिक वनवृत्तातील पश्चिम नाशिक वनविभागातील वनजमीन वळतीकरण करणेबाबतचा प्रस्ताव कार्यान्वित आहे. सदर प्रस्तावासाठी समन्वयक तथा केंद्रस्थ अधिकारी म्हणून उप वनसंरक्षक, शहापूर यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

त्यास अनुसरुन संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये प्राप्त प्रस्तावाचे Hard Copy प्रत व संदर्भ क्र. 3 अन्वये Online प्राप्त प्रस्तावाची छाननी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास येत आहेत.

1. प्रस्तावामध्ये समाविष्ट करणेत आलेले Certificate No. 8 हे केवळ केंद्रस्थ अधिकारी व उप वनसंरक्षक, शहापूर यांचे तिन्ही वनविभागांचे एकत्रित जोडणेत आलेले असून सदर प्रमाणपत्र उप वनसंरक्षक, ठाणे व पश्चिम नाशिक यांचे देखिल जोडणे आवश्यक आहे.

2. प्रस्तावामध्ये समाविष्ट करणेत आलेले Certificate No. 48 हे केवळ केंद्रस्थ अधिकारी व उप वनसंरक्षक, शहापूर यांचे तिन्ही वनविभागांचे एकत्रित जोडणेत आलेले असून सदर प्रमाणपत्र उप वनसंरक्षक, ठाणे व पश्चिम नाशिक यांचे देखिल जोडणे आवश्यक आहे.
3. विषयांकित प्रस्तावांतर्गत नमूद केलेले वनेत्तर क्षेत्राबाबतचे उप वनसंरक्षक, शहापूर, ठाणे व पश्चिम नाशिक यांचे प्रमाणपत्र जोडणेत आलेले नाही.
4. प्रस्तावामध्ये जोडणेत आलेल्या Certificate No. 34 मध्ये केवळ खाजगी वनाबाबत उल्लेख केलेला असून त्यामध्ये वनहक्क कायदयांतर्गत मंजूर वनहक्क दावेदार व एकसाली प्लॉटधारक यांचेबाबत देखिल उल्लेख करणे आवश्यक आहे.
5. प्रस्तावित क्षेत्रातील तोड कराव्या लागणाऱ्या वृक्षांची यादी (Local Name & Scientific Name) जोडणेत आलेली नाही.

तरी प्रकरणी वर नमूद केलेल्या त्रुटींची पूर्तता करुन सुधारीत परिपूर्ण प्रस्ताव लवकरात लवकर सादर करणेत यावा, जेणेकरुन प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही योजणे सोयिस्कर होईल.

उप वनसंरक्षक
शहापूर वनविभाग, शहापूर

प्रतिलिपी:- मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे व नाशिक यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी:- उप वनसंरक्षक, ठाणे व पश्चिम नाशिक यांजकडे माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

सही/-
उप वनसंरक्षक
शहापूर वनविभाग, शहापूर